परिपत्रक

प्रति,

जिल्हादंडाधिकारी (सर्व)

रत्नागिरी

जा.क्र.डीपीआर/संकीर्ण/१२११८/११३५/कक्ष-५, पुणे-१, दिनांक ९ फेब्रु, २००१.

विषय: कारागृहातील प्रत्येक मृत बंद्याच्या मृत्यु बाबत.

१. दंडाधिकारी चौकशी अहवाल
२. व्हिडीओग्राफी रिपोर्ट
३. पोस्टमार्टेम रिपोर्ट इत्यादी राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना वेळेवर सादर करण्याबाबत.

संदर्भ: १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डीपीआर/अमेंडमेंट/१९९९/क-१० (एनएचआरसी) दिनांक २३.३.२००० अन्वये अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन गृह विभाग, मुंबई ३२ यांची क्रमाक डीपीआर/४५९९/१/१७५/ पीआरएस-३, दि.९.२.२००० ची पाठविलेली इंग्रजी व मराठी अधिसूचना.

२) श्री एन गोपालास्वामी, सेक्रेटरी जनरल, रा.मा.ह.आ. नवी दिल्ली यांचे इंग्रजी अ.शा.पत्र क्र.४०/१/१९९९-२०००/सी.डी.(एनआरआर) दि.५.१.२००१.

३) गृह विभाग, महाराष्ट्र शासन पोल-१४ मुंबई ३२ यांचा शासन निर्णय क्रमांक एचआरसी/०९९५/३४/पोल-१४ दिनांक १८.१.१९९९

प्रस्तुत प्रकरणी कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ वर नमुद केलेल्या या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक २३.३.२००० अन्वये आपणास यापूर्वीच पाठवून कारागृहीन प्रत्येक मृत बंद्याच्या मृत्युबाबत दंडाधिकारी चौकशी अहवाल तातडीने त्या त्या संबंधित कारागृह अधिक्षकांना, त्यांचेमार्फत आयोगास, शासनास पाठविणे संदर्भात देणेबाबत कळविले होते.

२. तद्नंतर संबधित कारागृह अधीक्षकांनी देखील मृत बंद्यांचे दंडाधिकारी चौकशी त्वरेने करणेबाबत प्रत्यक्ष पत्राद्वारे संपर्क साधलेला आहे. त्याचप्रमाणे या कार्यालयाकडुनही पत्राद्वारे कारागृहा कडील मृत बंद्याची दंडाधिकारी चौकशी करणे बाबत विनंती केली आहे असे असतानाही, आपणाकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही व परिणामी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडुन दंडाधिकारी चौकशी अहवाल प्रलंबित असल्याचे शासनास कळविले आहे.

३. त्यासाठी तातडीचे संदर्भासाठी यासोबत संदर्भ क्र.२ वर नमूद केलेले श्री.एन.गोपालास्वामी, सेक्रेटरी जनरल, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांचे अर्ध शासकीय पत्र दि.५.१.२००१ ची प्रत जोडली आहे. त्यांनी त्यांचे पत्रातील परिच्छेद क्रमांक २ मधील उप परिच्छेद क्र. १.१ मध्ये दंडाधिकारी चौकशी अहवाल, घटना घडल्यापासून २ (दोन) महिन्याच्या आत आयोगास पाठविणेबाबत सूचना केलेल्या आहेत. तरी त्या सूचनांची अंमलबजावणी होऊन मृत बंद्याचे दंडाधिकारी चौकशी अहवाल तातडीने संबंधित कारागृह अधिक्षकांना उपलब्ध करुन देण्यात यावे अशी पुन्हा विनंती आहे.

2826

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
17 FEB 2001

डी. सिंगारवेल

(डी. सिंगारवेल) 9/2/2001

अपर पोलीस महासंचालक व
कारागृह महानिरीक्षक, म.रा.पुणे १.

प्रतः अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना आयोगाचे पत्र दिनांक ५.१.२००१ सह पुढील कारवाईसाठी.

प्रतः उप सचिव, गृह विभाग(पीआरएस-२) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना आयोगाचे पत्र दिनांक ५.१.२००१ सह पुढील कारवाईसाठी.

प्रतः विभागीय आयुकत (महसूल) (सर्व)
पुणे, नवी मुंबई, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नागपूर.

प्रतः पोलीस आयुक्त (सर्व)
पुणे, मुंबई, नवीमुंबई, ठाणे, औरंगाबाद,नाशिक, सोलापूर, अमरावती, नागपूर.

प्रतः जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व) व
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, व रुग्णालय, (सर्व)
यांना पुढील कार्यवाहीसाठी.

२. त्यांना विनती करण्यांत येते की, आयोगाने त्यांचे अर्ध शासकीय पत्र दिनांक ५.१.२००१ मध्ये परिच्छेद क्रमांक २ मधील उप परिच्छेद क्रमांक १.१ मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे **कारागृह मृत बंद्याचे पोष्टमार्टम रिपोर्टची प्रत दिलेल्या मुदतीच्या आत संबंधित कारागृह अधीक्षकांना त्यांचे मार्फत आयोगास पाठविणेसाठी देण्यात यावी तसेच परिपत्रकातील संदर्भ क्रमांक ३ नुसार शवविच्छेदनाचे व्हिडीओ चित्रणांची कॅसेट आपणाकडून कोणत्या जावक क्रमांकान्वये आयोगास पाठविली आहे तो क्रमांक व दिनांक संबंधित कारागृह अधीक्षकांना देण्यात यावा व सहकार्य करावे.**

प्रतः संचालक, वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, सांताक्रुझ(पूर्व) मुंबई ४०० ०९८ व उप संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, पुणे, औरंगाबाद, नागपूर यांना पुढील कारवाईसाठी.

२. त्यांना विनंती करण्यात येते की, आयोगाचे पत्र दि. ५.१.२००१ मध्ये परिच्छेद क्र.३ मध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे कारागृह मृत बंद्याचा व्हिसेरा रिपोर्ट तातडीने कारागृह अधीक्षकांना, त्यांचेमार्फत आयोगास पाठविणेसाठी विनाविलंब देण्यात यावा व सहकार्य करावे.

प्रतः अधीक्षक, जिल्हा / मध्यवर्ती कारागृह (सर्व)

प्रतः कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व)

प्रतः प्राचार्य, किशोर सुधारालय, नाशिक /
तुरुंग अधिकारी प्रशिक्षण शाळा, येरवडा, पुणे ४११ ००६.

२. सोबत आयोगाचे अर्ध शासकीय पत्र दिनांक ५.१.२००१ ची प्रत पुढील कारवाईसाठी जोडली आहे व **त्याप्रमाणे नमूद केलेले अहवाल संबंधिताकडून मिळविणेसाठी सतत पाठपुरावा करावा.**

टी. सिंगारवेल
५/२/२००१

**(टी. सिंगारवेल)**
अप्पर पोलीस महासंचालक व
कारागृह महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.

N. Gopalaswami,
Secretary General.

D.O.No. 40/1/1999-2000/CD(NRR
National Human Rights Commission,
Sardar Patel Bhavan,
Sansad Marg, New Delhi-110001

Dated the January 5, 2001

Dear Home Secretary,

As you are aware, the Commission had issued -- general instructions in 1993 that intimation be given to the Commission of any custodial death within 24 hours of its occurrence. These intimations are to be -- followed with the post mortem reports, Magisterial -- inquest Report/Video-graphy report of the post-mortem etc. However, it is found that there is a considerable delay in sending the post-mortem report alongwith the videography and the Magisterial Inquest Report.

2.0. This causes delay in the Commission in processing the cases of custodial deaths and the awarding of interim relief wherever prima facie there is reason to conclude that the custodial death was a result of custodial - violence. In order to streamline the procedure, the following instructions are issued.

1.1. The post mortem report along with the videograph and the Magisterial enquiry report must be sent within 2 months of the incident.

1.2. The post mortem reports have to be sent in the - new proforma which was circulated vide Circular No.4/3/97-PRP dated 10-08-1995. All concerned authorities may be instructed to use the new proforma. A copy of the new proforma is enclosed for ready reference.

2. In every case of custodial death, Magisterial-Enquiry has also to be done as directed by the Commission. It should be ensured that the Magisterial Enquiry is - completed as soon as possible but in such a way that - within 2 months deadline mentioned in Para 1.1 the Magisterial Enquiry report is also made available.

3. In some cases of custodial death, after post-mortem the viscera is sent for examination and viscera report is called for, However, the viscera report - takes some time in coming and therefore, this is to clarify that the post mortem report and other documents should be sent to the Commission without waiting for the viscera report. The viscera report should be sent subsequently as soon as it is received.

Instructions may kindly be issued to all concerned authorities to adhere to the above guidelines.

Thanking you and with Season's Greetings,

Yours sincerely,
Sx/-x-
( N. Gopalaswami )

The Home Secretary,
Govt.of Maharashtra,
Mumbai.